Anuly

# मुंबई विद्यापीठ

क्र.विशेष कक्ष अपंग/(६६)/ ५५ /२००५

**परिपत्रक**

प्राचार्य/संचालक कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व शिक्षणशास्त्र महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त पदव्युत्तर संस्था, तसेच उपकुलसचिव आस्थापना व शिक्षक नियुक्ती विभाग यांना कळविण्यात येते की, शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पत्र क्र.संकिर्ण/१००३(०३/०४) आस्था-२ दिनाक २३ जुलै २००४ सोबत जोडलेल्या शासन निर्णय क्रमांक अपंग २००३/प्र.क्र.२८७/सुधार-३ दिनांक २० मे २००४ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी पाठविण्यात येत आहे.

कुलसचिवांकरिता

दिनांक :५ फेब्रुवारी, २००५
स्थळ : मुंबई.

---

## महाराष्ट्र शासन

महत्वाचे
तात्काळ

क्र. संकिर्ण-१००३/(०३/०४)आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०००३२
दिनांक : २३ जुले,२००४

प्रति,
सर्व संचालक
सर्व विद्यापीठांचे कुलसचिव
सर्व प्रशासकीय कार्यासन अधिकारी - आस्था-१,ताशि-४/५,व्यशि-१/४, मशि-२/५/६, विशि-२/४/५, साशि-५,

विषय :- शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ ची अपंगाची आरक्षित पदे भरण्यासाठी न्यायालयाने दिलेल्या मान्यतेबाबत.
संदर्भ :-१) शासन पत्र क्र.संकीर्ण-१००३/(४०८/२००३)/आस्था-१, दि. २१/७/ ०३, ३०/८/२००३.
२) शासन पत्र क्र.संकीर्ण-१००३/(०३/२००४)/आस्था-१ दि. ७/५/२००४, २६/५/२००३.

संदर्भित पत्रान्वये शारिरीकदृष्टया अपंग व्यक्तींच्या राखीव पदांचा अनुशेष भरुन काढण्याबाबत विशेष मोहिमे अंतर्गत विहीत मुदतीत पदे भरुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

२. यासंदर्भात सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभागाचे दि.३०/५/०४ चे पत्र व त्यासोबतची सहपत्रे यासोबत जोडली आहेत. अपंग बेरोजगारीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, मुख्य आयुक्त, अपंग कल्याण, नवी दिल्ली यांचेकडे विविध स्वयंसेवी संस्थाकडून याचिका दाखल केल्या जात आहेत. ही बाब विचारात घेऊन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन आपल्या संचालनालयातील तसेच संचालनालयाच्या अखत्यारितील कार्यालये तसेच सर्व अनुदानित संस्थामधील अपंग आरक्षणाची पदे तात्काळ भरावित. तसेच पदभरतीबाबतचा अहवाल विहित प्रपत्रात (शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये व अनुदानित संस्था यांचा स्वतंत्रपणे) शासनास तात्काळ सादर करावा. अपंगांचा अनुशेष न भरल्यास आपणास/ विभागास या बाबत न्यायालयात स्वतंत्रपणे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल. ही बाब विचारात घेऊन सदर प्रकरणी त्वरीत कार्यवाही करावी, ही विनंती.

सही
(सु.श.अंगाडे)

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:अपंग २००३/प्र.क्र.२८७/सुधार-३
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रिडा व
विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक:२० मे, २००४

प्रति,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,

विषय:- शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ ची अपंगांची आरक्षित पदे भरण्यासाठी न्यायालयाने दिलेल्या मान्यतेबाबत.

महोदय,

शासन सेवेत हजेरी सहायकांच्या नियुक्त्या नियमित करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या याचिके संदर्भात मा.उच्च न्यायालयाने शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावरील भरतीवर निर्बंध आणले होते. सदर निर्बंधातून ज्याप्रमाणे मागासवर्गीयांचे आरक्षण भरण्यासाठी सूट देण्यात आली त्याप्रमाणे अपंगांचे आरक्षण व अनुशेष भरणे शक्य व्हावे यासाठी अशी सूट मिळविण्याबाबत हा विभाग प्रयत्नशील होता. आता मा.उच्च न्यायालयाने शासन सेवेतील अपंगांचा अनुशेष भरणे शक्य व्हावे यासाठी राज्यातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अतांत्रिक पदे भरण्यास अंडरटेकींगच्या अंमलबजावणीच्या अधीन राहून परवानगी दिलेली आहे. न्यायालयीन आदेशाची प्रत व अंडरटेकींगची प्रत सोबत जोडली आहे. न्यायालयाचे वरील आदेश लक्षात घेता, त्याचप्रमाणे या विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना व जिल्हाधिकाऱ्यांना अपंगांचा अनुशेष भरणे शक्य व्हावे यासाठी विशेष भरती मोहिम सुरु करण्याच्या दिलेल्या सूचना लक्षात घेता आपण आपल्या विभागात तसेच आपल्या विभागांतर्गत सर्व क्षेत्रिय कार्यालयात असलेल्या अपंगांच्या आरक्षित पदांचा अनुशेष भरण्याबाबतची कार्यवाही तातडीने करावी. ही कार्यवाही करताना हजेरी सहाय्यकांचे यादीतील पात्र अपंग हजेरी सहाय्यकांचे यादीतील पात्र अपंग हजेरी सहाय्यकांद्वारा प्रथम अनुशेष भरावा व त्यानंतर इतर अपंग उमेदवारांचा विचार करावा. यासंदर्भात या विभागाने दि.२७.४.२००४ च्या विशेष परिपत्रकाद्वारे राज्यातील शासकीय /निमशासकीय/ अनुदानित आस्थापना/ व्यापारी तत्वावरील उपक्रम /ज्या ठिकाणी शासनाचे भागभांडवल गुंतलेले आहे असे उपक्रम यांचे अनुदान जर त्या आस्थापनांनी अपंगांच्या अनुशेष भरला नसेल तर रोखावे अशा सूचना दिल्या आहेत. याकडेही आपले विशेष लक्ष वेधण्यात येत आहे

२. प्रसंगत: येथे आपल्या निदर्शनास आणण्यात येते की, अपंगांच्या बेरोजगारीच्या अनुषंगाने उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, मुख्य आयुक्त, अपंगकल्याण, नवी दिल्ली यांच्याकडे विविध याचिका स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांच्याकडून दाखल केल्या जात आहेत व अशा याचिकांच्या अनुषंगाने या विभागास सर्व समावेश व प्रतिज्ञा पत्रे दाखल करावी लागत आहेत. अशा परिस्थितीत आपल्या विभागाकडून अपंगासाठी सुयोग्य पदांचा शोध घेऊन पद निश्चितीबाबतचा शासन निर्णय काढणे व त्यानुसार अपंगांचा अनुशेष भरणेही अत्यंत तातडीची बाब ठरत आहे. याबाबत आपल्या विभागाकडून कार्यवाही न झाल्यास भविष्यात दाखल कराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये तसे स्पष्ट नमूद करुन त्याबाबत आपल्या विभागास स्वतंत्रपणे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची कार्यवाही करावी लागेल. तरी अपंग व्यक्ती अधिनियमातील तरतूदीची अंमलबजावणी करण्याची शासनाची जबाबदारी, न्यायालयीन आदेश इ.सर्व बाबी विचारात घेऊन अपंगासाठी असलेल्या सुयोग्य पदांचा शोध घेणे व अपंगांचा अनुशेष भरणे हे कामे तातडीने करण्याच्या सूचना आपण संबंधितांना द्याव्यात, हि विनंती.

आपला स्नेहांकीत,
सही/-
(डॉ. सुन्नि[illegible]ल गौतम)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन